


सायं.दैनिक
www.beedkisan.in
# बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ■ वर्ष ६ ■ अंक १०० ■ रविवार, दि. १६ ऑगस्ट, २०२६ ■ पोस्टल दिनांक १७ ऑगस्ट, २०२६ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.

BEED ■ Year-6 ■ Issue-100 ■ Sunday 16 August, 2026 ■ Postal Date 17 August, 2026 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2


## सुनेत्राताई, पीए अन् स्थानिक नेत्यांच्या जिवावर कारभार हाकू नका

# हेच आ.संदीप क्षीरसागर आहेत जे घड्याळाच्या प्रचारासाठी बीडहून पिंपरी चिंचवडला आले होते

## शासकीय कार्यक्रम डावलून उघडपणे प्रोटोकॉल मोडला

**बीड । किसान न्युज**

**आमदार संदीप क्षीरसागर यांनी शासकीय कार्यक्रमाच्या निमंत्रणावरून आपली उघड नाराजी व्यक्त करीत स्थानिक लोकप्रतिनिधी असतानाही मला जिल्हाधिकारी कार्यालयातील झेंडावंदनाचे निमंत्रण देण्यात आले नाही, असा थेट आरोप केला. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) निधी वाटपावरून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पीए झरे आणि देशमुख यांच्या सांगण्यावरूनच येथील संपूर्ण कारभार चालत असल्याचा घणाघाती आरोप केला. वेळ पडल्यास आम्ही शांत बसणार नाही, रस्त्यावर उतरू, असा इशारा त्यांनी दिला आहे. यानंतर बीडमध्ये चर्चा रंगू लागल्या असून शासकीय कार्यक्रमात स्थानिक लोकप्रतिनिधीला डावलणे म्हणजे हा उघडपणे प्रोटोकॉल मोडलाजात आहे. तसेच सुनेत्राताई हे तेच संदीप क्षीरसागर आहेत जे बीडहून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीत घड्याळाच्या प्रचारासाठी आले होते अशी आठवण करुन देण्यात येत आहे.**



आ. संदीप क्षीरसागर यांनी नाराजी व्यक्त करताना आपली नाराजी व्यक्त करताना म्हणाले की, यापूर्वी कंकालेश्वर मंदिराच्या उद्घाटनासाठीही मला निमंत्रण देण्यात आले नव्हते. मी या भागाचा लोकप्रतिनिधी असतानाही मला डावलले गेले, यावरून स्पष्ट दिसते की इथे राजकारण केले जात आहे. तसेच डीपीडीसी मध्ये बोगस बिलं काढल्याच्या तक्रारी आम्ही केल्या, परंतु त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. अजितदादांनी ज्या गोष्टींचे शब्द लोकांना दिले होते, ते पाळले पाहिजेत. त्या जेवढ्या दुःखात आहेत तेवढ्या दुःखात आम्हीही आहोत. विकास कामांबाबतीतही निधी मिळत नाही. मी का नाराज होऊ नये? असे त्यांनी म्हटले.आधी बीडशहराला दहा दिवसाला पाणी मिळत होते ते आता वीस दिवसाला मिळत आहे. वेळ पडल्यास आता आम्ही गप्प बसणार नाही. आम्ही रस्त्यावर उतरणार आहोत. पीए झरे आणि देशमुख यांच्या म्हणण्यावरुन इथला कारभार होतोय. सुनेत्रा ताईंनी पीएच्या मनावर कारभार करू नये, असे म्हणत संदीप क्षीरसागर यांनी नाराजी व्यक्त केली. संदीप क्षीरसागर पुढे म्हणाले की, दादा आणि पंकजाताईंच्या काळातला कारभार » पान २ वर

### ताई चहा पेक्षा केटली गरम असे होऊ देवू नका

**राजकीय क्षेत्रात नेत्या पेक्षा त्यांचे पीएच कारभारी असल्यासारखे वागायला लागले की, 'चहा पेक्षा केटली गरम' ही म्हण खूप प्रसिद्ध आहे. पण दादांच्या समोर असल्या प्रकारांना थारा नव्हता, त्यांनी कधीच या पीएंना काना खालीच ठेवत, नाकापेक्षा मोती जड होऊ दिले नाही. पण आ. संदीप क्षीरसागर यांच्या आरोपानंतर उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या कार्यकाळात पीएच सर्व कारभार हाकत आहेत का? असा संशय व्यक्त केला जात आहे. यामुळे ताई 'चहा पेक्षा केटली गरम' असे होऊ देऊ नका अशी चर्चा सुरू झाली आहे.**

### सुनेत्राताई या युगात डोळे झाकून कोणावरही विश्वास ठेवू नका हा दादांचा सल्ला आहे?

**अजितदादा पवार यांनी आ. रोहित पवार यांना एका कार्यक्रमात आजच्या युगात डोळे झाकून कोणावरही विश्वास ठेवू नका असा सल्ला दिला होता. हा व्हिडिओ आजही लोकांच्या पसंतीचा ठरतो असून याची आठवण करुन द्यायची म्हणजे बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार या स्थानिक लोकप्रतिनिधी यांना डावलले जात असताना त्या शांत असल्याने त्या त्यांच्या यंत्रणेवर डोळे झाकून विश्वास ठेवत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे त्यांनी कोणावरही विश्वास न ठेवता सर्वांना सोबत घेऊन काम करीत बीडला बारामती करण्याचे दादांचे स्वप्न साकार करावे.**

---

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचे शानदार समारंभात भूमिपूजन

## परळीचे पशुवैद्यकीय महाविद्यालय मराठवाड्याच्या प्रगतीची नवी पायाभरणी ठरेल : सुनेत्राताई पवार

### परळीचा सकारात्मक बदल व भावी पिढीचे भविष्य उज्वल करता येतेय याचा आनंद : पंकजाताई मुंडे

### महाविद्यालयाला स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे नाव द्यावे - धनंजय मुंडे





**परळी वै. । किसान न्युज**

मराठवाडा ही संतांची संस्कृतीची आणि कष्टकऱ्यांची भूमी आहे. शेतीला आधार देणाऱ्या पशुधनाची काळजी घेणे ही आजच्या काळाची गरज आहे. परळीत उभे राहणारे हे महाविद्यालय मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाच्या पशुवैद्यकीय शिक्षणाचे मोठे केंद्र ठरेल. या दृष्टीने मराठवाड्याच्या प्रगतीची ही नवी पायाभरणी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांनी केले.समृद्ध शेतकरी, सुदृढ पशुपालन आणि पशुसंवर्धनातून स्वावलंबी » पान २ वर

### मंत्रीपदाचा उपयोग परळीसाठी करता आला याचा आनंद : ना.पंकजाताई

**बारामती येथील कृषी प्रदर्शनात अजितदादांनी या प्रकल्पाची घोषणा केली होती. या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून परळी परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासात्मक व सकारात्मक बदल घडणार आहेत. पशुपालकांना त्यांच्या व्यवसायासाठी मदत व्हावी यासाठी ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याची शासनाची भूमिका आहे.पशुसंवर्धन खात्याची मंत्री म्हणून परळी व परिसरासाठी येणाऱ्या पिढ्यांचे उज्वल भविष्य घडावे या दृष्टिकोनातून आपल्याला काहीतरी** » पान २ वर

# त्या अकरा नगरसेवकांच्या गटाला सुनेत्राताईंनी एक तास वेळ दिला

### अनिलदादांच्या वडीलकीचा सल्ला त्या नगरसेवकांच्या कामी आल्याची चर्चा


**बीड । किसान न्युज**

राष्ट्रवादी काँग्रेस (अप) चे त्या ११ नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री तथा पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्राताई पवार यांची भेट घेतली चर्चा केल्यानंतर तो अंतर्गत असलेल्या वाद मिटलाका? अशी चर्चा शहरात सुरू झाली. तसेच त्या दिवशी त्या ११ नगरसेवकांना सुनेत्राताई यांनी तब्बल १ तासाचा वेळ देवून चर्चा केली. तसेच नगरपरीषदेतील शिवसेना मित्र पक्षाचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी ११ नगरसेवकांना पालकमंत्री यांच्या दौऱ्याच्या आदल्या दिवशी बोलावून जी चर्चा केली आणि मोठा भाऊ म्हणून जो वडीलकीचा सल्ला दिला तो कामी आल्याचे सांगितले जात आहे.

बीड नगरपरिषदेच्या निवडणुका होऊन अवघे सहा महिने झाले आहेत. पण या सहा महिन्यातच सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नगरसेवकांचे दोन गट पडले आहेत. ११ नगरसेवकांचा एक गट वेगळ्या विचारात दिसत असल्याची चर्चा सुरू झाली आणि त्यात त्यांनी उचडपणे गटबाजीचे दर्शनही घडवले आहे. यामुळेच शहरवासियांनी टाकलेला विश्वास संपुष्टात येणार का? अशी परिस्थिती निर्माण झाली. तसेच या सत्तापरिवर्तनात आणि नवीन नगराध्यक्ष करण्यात शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा सिंहाचा वाटा असून, त्यांनी रात्रीचा दिवस करुन सत्ता मिळविण्यासाठी मेहनत घेतली पण यावर » पान २ वर

### मुंबईत ही चर्चा होणार!

**उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार या दि.१४,१५ दोन दिवस जिल्ह्याच्या दौऱ्यावर होत्या यावेळी त्यांच्यापुढे हा अंतर्गत वादाचा प्रश्न आला तेंव्हा त्यांनी कोणीही वेगळा नसून एक नगरसेवक असला तरी तो आपलाच आहे. पण आता वेळ नाही यामुळे दोन्ही गटांना मुंबई येथे बोलावून घेण्यात येणार आहे. तेथे समोरासमोर बसून काय अडचण आहे. कोणाची चूक ? कोण बरोबर हे ठरवून पुढे सर्वांनी सोबत काम करण्यासाठी निर्णय होणार असल्याचे सुत्रांकडून समजले आहे.**








## योगेश भुतपले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**बीड । किसान न्युज**

शहरातील बालेपीर भागातील रहिवासी योगेश भुतपले अंदाजे (वय ३० वर्ष) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने शनिवारी (दि.१५) रात्री १२ च्या सुमारास निधन झाल्याची घटना घडली. आज रविवारी (दि.१६) मयताच्या पार्थिवावर सकाळी ११:३० च्या सुमारास अंकुश नगर स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आला. यावेळी नातेवाईक, मित्र परिवार उपस्थित होता. मयताच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई, वडील, एक भाऊ, बहीण असा परिवार आहे. या घटनेने भुतपले कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात दैनिक किसान परिवार सहभागी आहे.




स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
✆ 9850643058

सोने २४ कॅरेट 149,500
२२ कॅरेट 138,000
चांदी प्रतिकिलो 240,000

गाळा किरायाणे देणे आहे

शहरातील बार्शी नाक्या पासून काही अंतरावरील इमामपूर रोडवरील आरसीसी गाळा किरायाणे देणे आहे. येथे किराणा, इलेक्ट्रिक अथवा इतर व्यवसायासाठी योग्य असे लोकेशन आहे.
:: संपर्क ::
मो.8485862151
मो.9730262660

